# <u>लोकशाही दिन अंमलबजावणी</u>

उपरोक्त विषयाचे अनुषगांने सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ चे शासन निर्णयानुसार सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी / अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी म्हणून यापुढे **लोकशाही दिन तालुका स्तरावर राबविण्याबाबत शासनाकडून आदेश देण्यात आले आहेत.**

लोकशाही दिन जिल्हाधिकारी स्तरावरील लोकशाही प्रत्येक महिन्याचा पहिला सोमवार ला आयोजित करण्यात येईल. सद्या उपविभागीय स्तरावरील सुरु असलेला लोकशाही दिन रद्द करण्यात येवून शासन निर्णयानूसार तालुका स्तरावर लोकशाही दिन हा प्रत्येक महिन्याचा तिसरा सोमवार ला आयोजित करण्यात येईल. महिन्याच्या पहिल्या किंवा तिसरा सोमवारला सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येईल. जिल्हाधिकारी लोकशाही दिनाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील.

लोकशाही दिन कार्यक्रम संबंधित जिल्हा व तालुका स्तरावरील मुख्यालयाच्या ठिकाणी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात येईल.

अर्ज स्वीकृतीचे निकष व कोणत्या विषयावरील अर्ज स्विकारले जाणार नाही त्याबाबी खालीलप्रमाणे आहेत.

**अर्ज स्वीकृतीचे निकष :-**

१) अर्ज विहित नमुन्यात असावा.(नमुना प्रपत्र १ अ तालुका स्तर व १ ब जिल्हा स्तर)
२) तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी.
३) चारही स्तरांवरील लोकशाही दिनाकरिता अर्जदाराने अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतींत पाठविणे आवश्यक राहील.
४) तालुका लोकशाही दिनानंतर १ महिन्याने जिल्हाधिकारी लोकशाही दिनात अर्ज करता येईल. जिल्हाधिकारी लोकशाही दिनानंतर दोन महिन्यांनी विभागीय आयुक्त लोकशाही दिनात व विभागीय आयुक्त लोकशाही दिनानंतर दोन महिन्यांनी मंत्रालय लोकशाही दिनात अर्ज करता येईल.

**कोणत्या विषयावरील अर्ज स्विकारले जात नाहीत :-**

१) न्यायप्रविष्ट प्रकरणे
२) राजस्व / अपिल्स
३) सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी.
४) विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज.
५) अंतिम उत्तर दिलेले आहे / देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विष्यासंदर्भात केलेले अर्ज.
६) तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर.
७) वरीलप्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनाकरीता स्विकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबंधित विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी ८ दिवसात पाठविण्यात यावे व त्याची प्रत अर्जदारास पृष्ठांकीत करण्यात यावी.

**विहित नमुना**

**प्रपत्र - १ (अ)**

**लोकशाही दिनात अर्ज सादर करण्याचा नमुना**

**तालुका लोकशाही दिन**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव व पूर्ण पत्ता | : | |
| २ | दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमाक | : | |
| ३ | विषय | : | |
| ४ | विनंती / निवेदन / तक्रारीच्या समर्थनार्थ दाखल केलेली कागदपत्रे | : | (a)<br>(b)<br>(c) |

**दिनांक :** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**सोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

तहसिलदार यांना उद्देशून अर्ज,

**अर्जदारांकरिता सर्वसाधारण सूचना**

१) लोकशाही दिन तहसिलदार कार्यालयात होईल. त्यावेळी मूळ अर्जासह उपस्थित रहावे.

२) वरील नमुन्यात अर्ज त्यासोबत अर्जाची आगाऊ प्रत जोडून लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी पाठविणे आवश्यक आहे.

३) वरील बाबींची पूर्तता केली नाही तर लोकशाही दिनात प्रत्यक्ष अर्ज सादर करता येणार नाही.

**प्रपत्र - १ (ब)**

**जिल्हाधिकारी लोकशाही दिनात अर्ज सादर करण्याचा नमुना**

**व आवश्यक कागदपत्रे**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव व पूर्ण पत्ता | : | |
| २ | दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमाक | : | |
| ३ | विषय | : | |
| ४ | तालुका लोकशाही दिनात अर्ज केला होता काय ? | : | |
| ५ | असल्यास , टोकन क्रमांक | : | |
| ६ | तहसिलदारांकडून मिळालेले उत्तर | : | |

**दिनांक :** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**सोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) जिल्हाधिकारी यांना उद्देशून अर्ज,

२) तालुका लो.दि.टोकन क्रमाक प्रत,

३) तहसिलदारांच्या उत्तराची प्रत,

**अर्जदारांकरिता सर्वसाधारण सूचना**

१) लोकशाही दिन जिल्हाधिकारी कार्यालयात होईल. त्यावेळी मूळ अर्जासह उपस्थित रहावे.

२) वरील नमुन्यात अर्ज त्यासोबत अर्जाची आगाऊ प्रत जोडून लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी पाठविणे आवश्यक आहे.

३) वरील बाबींची पूर्तता केली नाही तर लोकशाही दिनात प्रत्यक्ष अर्ज सादर करता येणार नाही.

४) प्रकरण थेट जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित असेल तर तालुका लोकशाही दिनातील टोकन क्रमांक व त्याची प्रत आवश्यक राहणार नाही.

उपरोक्त विहित नमून्यातीलच अर्ज लोकशाही दिनी स्विकारण्यात येतील. सदर तालुका व जिल्हा स्तरावरील विहित नमूना तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपलब्ध आहेत.